MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 01

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

संपादक मंडल

मुख्य संपादक

प्रा.वसिम देवेंद्र (हिंदी) डॉ. योगिता संधवणे (मराठी)

सहायक संपादक

प्रा.नारायण शिंदे डॉ. राजेंद्र ठाकरे

डॉ. नीतिन चौरत प्रा. बापु देवकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vaidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors



326

Dr. Babasaheb Ambedkar Maha... Aundh, Pune-67

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 04

# INDEX



| | | |
|---|---|---|
| 1. | संत चोखामेळा यांचे अभंग<br>प्रा.विजयकुमार रामदास चोडके, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 10 |
| 2. | [illegible] | 16 |
| 3. | मराठी संत साहित्यातील विविध विचार<br>प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | 20 |
| 4. | कर्मयोगी संत गाडगेबाबा<br>सहा प्रा. दादा मच्छिंद्र समुद्र | 24 |
| 5. | "मराठी संत साहित्य परंपरा व स्वरुप"<br>प्रा. डॉ. बोडखे जी.पी. | 29 |
| 6. | मराठी जैन संत साहित्य<br>प्रा.डॉ. जगदीश आवटे, | 33 |
| 7. | संत साहित्य परंपरा व स्वरूप<br>डॉ. भास्कर निफाडे, | 36 |
| 8. | संत - चोखामेळा यांच्या अंभगातील आत्मनिवेदन<br>डॉ. योगिता मारुती रांधवणे | 39 |
| 9. | "समाज सुधारक : संत तुकाराम"<br>डॉ.अनिल गर्जे, गिन्हे ज्ञानदेव किसनदेव | 42 |
| 10. | मराठी संत साहित्यातील स्त्रीचित्रण<br>प्रा. जाधव विजय साहेबराव | 46 |
| 11. | समाज प्रबोधनकार : संत तुकाराम<br>प्रा. डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 12. | संत नाम देवांच्या अभंगातील नवविधा भक्तीचे स्वरुप<br>श्री लक्ष्मण कोठावळे | 52 |
| 13. | मराठी संत साहित्य विविध विचार<br>प्रा. दत्तात्रय सदाशिव सावंत | 56 |
| 14. | मराठी संत साहित्यातील भक्ती स्वरूप<br>प्रा. कल्पना तवाजी रोकडे | 60 |
| 15. | संत तुकारामांच्या काव्यातील समाजजीवन<br>श्री. नवनाथ केरू रकटे | 69 |
| 16. | मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. गोटे मच्छिंद्र रामचंद्र, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 72 |
| 17. | ।। संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण ।।<br>प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | 77 |
| 18. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता<br>प्रा. सुधीर ब. मोरे | 82 |
| 19. | "मराठी संत कवयित्रींच्या अध्यात्मिक वाटचालीची परंपरा"<br>श्रीमती सुनिता आव्रे, | 86 |

Screenshot_2018-04-30-12-24-38.png



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 077

17

# ।।संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण।।

**प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर**
मराठी विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे.

==================================================================

## १.१ प्रास्ताविक

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. समाजातील विसंगतीवर प्रकाश टाकून समाजाला सन्मार्गावर आणण्याचे महत्कार्य संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास व संत तुकाराम आदी संतांनी केलेले आहे. महाराष्ट्राची आजची जी काही सांस्कृतिक परंपरा आहे. या परंपरेत संतांचे कार्य व योगदान अतुलनीय आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य, समाजप्रबोधन, नीतीची शिकवण या अनेक हेतूने संतांच्या वाङ्मयाची निर्मिती झालेली आहे. मराठी मन व मराठी संस्कृती यांचे तत्कालीन जीवनदर्शन संतसाहित्यात दिसते. संतांच्या बाबतीत नेहमी म्हटले जाते, 'ज्ञानदेवें रचिला पाया तुका झालासे कळस'. ही उक्ती यथार्थ आहे.

## १.२ संतपरंपरेत संत तुकारामाचे स्थान:—

संत तुकारामांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा मोरे (आंबिले). तुकोबांचे अभंग महाराष्ट्रातील अनेकांच्या अंत:करणात स्थिरावलेले आहेत. संत तुकारामांचे अभंग हे महाराष्ट्राचे अमूल्य असे वैचारिक धन आहे. तुकारामांचे अभंग व त्यांचे लौकिक जीवन अलग करता येत नाही. त्यांच्या प्रत्येक अभंगातून त्यांचा जीवनविषयक विचार व दृष्टिकोन व्यक्त होतो. जीवन जगताना सामान्य माणसाला येणारे सर्व अनुभव त्यांनी अनुभवले , जनजीवन न्याहाळले व त्या अनुभवांची मांडणी अभंगाद्वारे केली. लोकांच्या भाषेत बोलणारा एक संतकवी म्हणून संत तुकारामांची ओळख आहे. तुकोबांचे सुमारे पाच हजार अभंग उपलब्ध असून त्या अभंगांची सामाजिक आवाहकता सार्वकालिक अशी आहे. ''मराठी सारस्वतात तुकोबांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वात वरचे असून ती सामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडली आहे''[१] संत तुकारामांच्या अभंगातून जीवनभाष्य केलेले आहे. महाराष्ट्राला सामाजिक नीतिमूल्यांची खऱ्या अर्थाने परखडपणे, स्पष्ट शब्दात शिकवण देणारे लोकशिक्षक म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करणे यथोचित ठरेल. महाराष्ट्राच्या भागवत धर्माच्या मंदिराचा कळस म्हणून संत तुकारामांचा उल्लेख केला जातो. स्त्रीपुरुष, ग्रामीण नागर, शिक्षित — अशिक्षित, भाविक , वारकरी, बुध्दिवंत, कवी, समीक्षक अशा सर्वच लोकांनी तुकारामांच्या अभंगांचा गौरव केलेला आहे. 'तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील जवळजवळ अखेरचे प्रमुख वारकरी संत त्यांची कविता म्हणजे संत साहित्याचा कळसाध्यायच म्हटला पाहिजे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, यांच्या सांस्कृतिक कार्याचा वीणा त्यांनी खांद्यावर घेतला. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तर तुकारामांचे कार्य फार मोलाचे आहे. वंशपरंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्तीची मिरास त्यांनी वाढविली. स्त्री—शूद्रांपर्यंत पोचविली. नाममहिम्याने मोक्षाची पायवाट सोपी केली. आषाढी कार्तिकी पंढरीची वारी करणाऱ्या भागवंताचा अभिमान वाहिला.''[२] त्यांच्या अभंगातून त्यांची विविध रूपे दिसतात. संत कवी, तत्वचिंतक, समाजप्रबोधनकार, लोकशिक्षक अशी विविध रूपे त्यांच्या



328

रूपे दिसतात. संत कवी, तत्वचिंतक, समाजप्रबोधनकार, लोकशिक्षक अशी विविध रूपे त्यांच्या



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 078

अभंगातून डोकावतात. 'बुडती हे जन देखवेना डोळा, म्हणूनिया येतो कळवळा' या भावनेतून त्यांनी समाजाला कळकळीने उपदेश केलेला आहे. संत तुकारामांच्या वाणीचा व अभंगांचा प्रभाव समाजमनावर मोठया प्रमाणावर पडलेला आजही दिसून येतो. भागवत संप्रदायाचा इतिहास बहेणाबाईंनी एका अभंगातून सांगितलेला आहे.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालिया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले हे आवार ॥
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा॥

बहेणाबाईंनी सर्व संतांच्या कार्याचा यथोचित गौरव वरील अभंगातून केलेला आहे. वारकरी मंदिराचा कळस म्हणून संत तुकारामांचा उल्लेख केलेला आहे.

## १.३ संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण :–

संत परंपरेत एक सडेतोड भूमिका घेऊन तत्कालीन समाजव्यवस्थेवर, कर्मकांडावर, बुवाबाजीवर, अंधश्रध्दांवर असूड ओढणारा एक लोकशिक्षक संतकवी म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करणे महत्त्वपूर्ण ठरेल. कसलीही भीडभाड न ठेवता आपल्या विचारावर ठाम राहून समाजोध्दाराची भूमिका घेऊन संत तुकारामांनी मानवतावादी भूमिकेतून अभंगरचना केलेली आहे. जीवन जगताना कोणीही उच्च नाही व कोणीही कनिष्ठ नाही, 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ,' अशी स्पष्ट भूमिका संत तुकारामांनी घेतलेली होती.

आचारभ्रष्ट समाज, नीतिमूल्यांची पायमल्ली, विपरित कौटुंबिक नाती, भयावह समाजजीवन, पोटभरू कथाकार, वाढती भोंदूगिरी व बुवाबाजी, अंधश्रध्दा व कर्मकांड या सर्वच बाबींवर संत तुकारामांनी आपल्या अभंगातून सडेतोड विचार मांडलेले आहे. एक लोकउध्दारक संत म्हणून त्यांची ओळख त्यांच्या अभंगरचनेतून होते. तत्कालीन समाजव्यवस्था विपरित झाली होती. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लोकांना लुबाडणाऱ्या भोंदुबाबांची संख्या वाढत चालली होती. अशा भोंदूगिरीचा पर्दाफाश तुकारामांनी अनेक अभंगातून केलेला आहे.

" लांब लांब जटा काय वाढवूनि । बावडे घेऊनि कोधे चाले।१ ॥
खायाचा बोलसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैचा।ध्रु॥
सेवी भांग अफू तमाखु उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥२॥
तुका म्हणे ऐसा सर्वस्वे बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग॥३॥ (अभंग क्र. २७७७)
सदा सर्वकाळ अंतरी कुटील। तेणे गळां माळ घालूं नये ॥१॥
ज्यासी नाही दया क्षमा शांती। तेणे अंगी विभूती लावू नये ॥ध्रु॥(अभंग क्र. २७७९)

समाजातील वरीलप्रमाणे वर्णन केलेल्या बुवांना स्पष्टपणे तुकारामांनी बजावले आहे की, जटा वाढवून कोधी, तापशी व जनाला शिव्या देणारा, अफू , भांग, तमाखू खाणारा, मनाने कुटिल असणारा, ज्याच्या अंगी दया क्षमा शांती नाही अशा लोकांनी हरीभक्ती करू नये व अंगाला विभूती लावू नये अशी स्पष्ट भूमिका संत तुकारामांची आहे.

''गाजराची पुंगी । तैसे नवे आले योगी ॥१॥
काय करोनि पठन । केली अहंता जतन ॥ध्रु॥
अल्प असे ज्ञान । अंगी ताठा अभिमान'' (अभंग क्र.२८४४)

अल्प अशा ज्ञानाचा अभिमान बाळगणारे लोक संत होऊ शकतात का? अशा लोकांचे ' हाणोनी फोडा तोंड'' असे संत तुकाराम म्हणतात.



329

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No. 62759 | Vidyawarta® | February 2018 Special Issue | 079

समाजाला सन्मार्ग दाखविणे हेच खरे प्रमुख कार्य संतांचे आहे. परंतु व्यसनाच्या आहारी गेलेले बुवा समाजाला काय ज्ञान देणार? तेथे पांडुरंग कसा भेटणार? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

" ऐसे संत आले कळी । तोंडी तमाखूची नळी ।।१ ।।
स्नानसंध्या बुडविली । पुढे भांग वोडवली ।।धृ ।।
भांगभुर्का हे साधन । पची पडे मद्यपान ।।२ ।।
तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैचा पांडुरंग ।।३ ।। (अभंग क्र. २८४७)

श्वान भगवे असले म्हणून त्याच्याकडे ज्ञान असेल का? अन जटा वाढविल्या म्हणून संत होता येते का ? याची विचारणा संत तुकारामांनी पुढील अभंगातून केलेली आहे.

" भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ।।१ ।।
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिती ।।धृ ।।
करोनिया भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी ।।२ ।।
तुका म्हणे कासया करावे । देहासी दंडावे वाउगें चि ।।३ ।। (अभंग क्र. ३८५२)

असे वर्तन न करता खऱ्या अर्थाने , मनाने ईश्वराची भक्ती करावी असा उपदेश ते करतात. भगवी वस्त्रे घालून कोणी संन्यासी होत नाही, त्यांना विषयवासना सुटत नाही, कदान्नापेक्षा चांगले अन्न त्यांना खावे वाटते. इतरांनी आपला मान राखावा , जटा लांबवून सर्वांगाला विभूती लावून , पोट भरण्यासाठी नवेनवे उपाय शोधणारे हे ढोंगी साधू 'तुका म्हणे जाय नर्क लोका' असेही स्पष्टपणे बजावतात. संतचिन्हे अंगी घालूनी व नुसतेच जगात भूषण मिरवणारे, वरवर विरक्ती दाखविणारे परंतु काम, क्रोध, लोभ चित्ती असणारे भोंदू जगाला नेहमीच फसवत राहतात. अनेक कथेकरी आजही मोठया प्रमाणात पैसे घेऊन कीर्तन करतात. 'मोल घेउनियां कथा जरी करी । तरी भंगो हरी देह माझा।' असे तुकाराम म्हणतात. पांडुरंगाच्या कृपेनेच मी कथाकिर्तन करतो आणखी मला काय हवे? असा प्रश्नही ते विचारतात. अंगात विविध देवदेवतांचे वारे येणाऱ्या भोंदूनाही संत तुकारामांनी फटकारलेले आहे.

" अंगी घेऊनिया वारें दया देती । तया भक्ता हाती चोट आहे ।।१ ।।
देव्हारा बैसोनि हालविती सुपे । ऐसी पापी पापें लिंपताती ।।धृ ।।
एकीबेकीन्यायें होतसे प्रचित । तेणें लोक समस्त भुलताती ।।२ ।।
तयाचे स्वाधीन दैवते असती । तरी कां मरती त्यांची पोरें ।।३ ।।
तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तो ही नव्हे ।।(अभंग क्र. ४२५५)

अंगात दैवतांचे वारे येणारे लोक इतरांना फसवितात, भूलवितात. त्यांना जर दैवते अधीन झाली आहेत तर मग त्यांची मुले कशी काय मृत्यू पावतात अशा मार्मिक प्रश्न वरील अभंगातून संत तुकारामांनी विचारला आहे.

तत्कालीन समाजात भोंदूगिरी करणाऱ्यांची संख्या मोठी होती. या भोंदूगिरी करणाऱ्या बुवांवर अनेक अभंगातून संत तुकारामांनी असूड ओढलेले आहेत.

" ऐसे कैसे जाले भोंदू। कर्म करोनी म्हणती साधू ।।१ ।।
अंगा लावूनिया राख । डोळे झांकुनि करिती पाप ।।धृ ।।
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।२ ।।
तुका म्हणे सांगा किती । जळो तयांची संगती ।।३ ।। (अभंग क्र.४२८७)

संत तुकारामांच्या काळात फसविणाऱ्या भोंदुबुवांची संख्या जशी अधिक होती तसेच भोंदुबाबा आजही मोठया संख्येने आहेत. अशा भोंदूबाबांनी सेवा लोकांनी करू नये. 'तिर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी' असेही ते स्पष्ट करतात. खरा साधू कोणता ? ज्याला गर्व नाही अभिमान नाही व ज्याच्या ठायी समाजउद्धाराची तळमळ आहे. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले',



330

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67.



तोचि साधु ओळखावा , देव तेथेंचि जाणावा' अशी साधुची व्याख्याच जणू संत तुकारामांनी अतिशय सोप्या शब्दात केलेली आहे. भिक्षापात्र हाती घेणे म्हणे लाजीरवाणे जीणे अशा जगण्याचा त्यांनी धिक्कार केलेला आहे. वर वर भक्तिभाव ठेवून देव कधी भेटत नाही. अशा भोंदू लोकांची संगती मानवाला अधोगतीस नेल्याशिवाय राहणार नाही. साधूनं सुद्धा चांगल्या संगतीतच रहावे. 'ढेकणाने संगे हिरा जो भंगला, कुसंगे नाडला तैसा साधू' अशी गत त्यांची होईल. सिंहस्थपर्वणीतील भोंदूगिरीबद्दलही तुकारामांनी 'आली सिंहस्थपर्वणी न्हाव्या भटा जाली धणी' असे म्हटलेले आहे. स्नान केले म्हणजे अवगुण कमी झाले का? वर्तनात सुधारणा झाली का? असे प्रश्न तुकोबांनी विचारले आहे.

समाजात सर्वच भोंदूसाधु नाहीत तर काही अंतर्बाहय निर्मळ मनाचे साधूही आहेत. पण त्या साधूंना समाजात ओळखले जात नाही. काही लोक या ईश्वरभक्तांचा उपहास करतात. त्याविषयी संत तुकाराम म्हणतात.

" नाही देवाचा विश्वास । करी संताचा उपहास ।।१।।
त्याचे तोंडी पडे माती । हीन शूकराची जाती ।।धृ।। (अभंग क्र. ३५७०)

बुवाबाजीचे चित्रण करणारे तुकारामांचे अभंग आजच्या परिस्थितीवर भाष्य करतात. "समाजाच्या भौतिक कल्याणासाठी सदाचाराच्या आणि नीरक्षीर न्यायाने लोकांसमोर तत्त्वज्ञान मांडणारा तुकाराम हा संतचळवळीतील एकमेव तत्त्वचिंतक आहे"[३] लोकांनी अंधश्रद्धा व भोंदूगिरी यापासून दूर राहून कार्यकारणभाव जाणून घ्यावा अशी कळकळीची तळमळ व्यक्त करणारा पहिला विवेकवादी व विज्ञानवादी संत म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करता येईल.

**१.४ बुवाबाजीचे चित्रण करणारे अभंग :— काही निष्कर्ष —**

१. सतराव्या शतकात कर्मकांड, बुवाबाजी, अंधश्रद्धा समाजात मोठया प्रमाणात पसरल्या होत्या. अशा अंधारमय परिस्थितीत सद्‌विवेकाची मशाल हाती घेऊन विज्ञानवादी दृष्टिकोन समाजात रूजविण्याचा प्रयत्न संत तुकारामांनी केलेला आहे.

२. संत तुकाराम 'लोकांनी सन्मार्गानेच वाटचाल करावी' यावर ठाम आहेत.

३. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही , मानियेले नाही बहुमता असा निर्धार' त्यांच्या विचारातून व्यक्त होते.

४. भोंदूगिरी करणाऱ्या लोकांवर कठोर भाषेत त्यांनी टीका केलेली आहे. त्यांच्या वर्तनावर असूड ओढलेले आहेत.

५. 'वरपांगी भक्ती असणारे, इतरांना लुबाडणारे , जीवनाचा खरा अर्थ माहीत नसणारे' अशा व्यक्तींना त्यांनी शब्दांचे फटकारे मारले आहेत.

६. ढोंगी साधूंच्या मागे समाजाने लागू नये अशी कळकळीची विनंती संत तुकाराम करतात.

७. दांभिकतेवर टीका करताना संत तुकारामांच्या वाणीला एक वेगळीच धार आलेली आहे.

८. सत्प्रवृत्ती व असत्प्रवृत्ती यामध्ये नेहमीच संघर्ष चालूच असतो. ज्ञानी माणसाला या प्रवृत्तींचा प्रकार विवेकाने ओळखता आला पाहिजे.

९. बुवाबाजीचे चित्रण करण्याऱ्या अनेक अभंगातून संत तुकारामांचा अंधश्रद्धांना किती कठोर विरोध आहे? हे समजते.

१०. देव माणसात असतो, दीनदुबळ्यात असतो. निस्वार्थी भावनेतून समाजाची सेवा करावी अशी भावना संत तुकाराम व्यक्त करतात.

**१.५ समारोप :—**

विरोध आहे? हे समजते.

१०. देव माणसात असतो, दीनदुबळ्यात असतो. निस्वार्थी भावनेतून समाजाची सेवा करावी अशी भावना संत तुकाराम व्यक्त करतात.

**१.५ समारोप :—**



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidywarta® | February 2018 Special Issue | 081

संत तुकारामांना 'जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज' या उपाधीने गौरविले जाते. आपल्या अभंगातून जनहिताचीच चर्चा त्यांनी केलेली आहे. समाजाने अंधश्रध्दा, बुवाबाजी यांपासून दूर रहावे यासाठी तळमळणारा संत म्हणजे संत तुकाराम होय. ''बोले तैसा चाले त्याची वंदीन पावले'' या उक्तीचा प्रत्यय संत तुकारामांच्या अभंगातून येतो आजच्या परिस्थितीतही संत तुकारामांच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ टीपा :—**

१. ल.रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास.' फडके प्रकाशन, कोल्हापूर, नववी व संस्कारित आवृत्ती , २००६ , पृ. १५१.

२. उनि., नसिराबादकर , पृ. १५८.

३. डॉ. किशोर सानप , प्रा. मनोज तायडे, 'तुकाराम व्यक्तित्त्व आणि कवित्व.' लोकवाङ्मय गृह मुंबई , तृ.आ. १९९८ पृ. ३१

**साधनग्रंथ :—** जगदगुरू संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा. प्रकाशक— विश्वस्त मंडळ श्री. विठोबा रखुमाई देवस्थान संस्थान श्रीक्षेत्र देहू पुणे. प्रथम आवृत्ती २०००

332